# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


==========================================================================

जावक क्रमांक – ७७३/६७ दिनांक :- १६ मे, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# 'म्हाडा' कोकण मंडळातर्फे दुसऱ्या जनता दरबार दिनात ०२ तक्रारींचे निवारण

मुंबई, दि. १६ मे, २०२५ :- जनसामान्यांच्या समस्यांकडे तात्काळ लक्ष देत त्यांचे निवारण करण्याच्या उद्देशाने 'म्हाडा'च्या कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे मुख्य अधिकारी श्रीमती रेवती गायकर यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या दुसऱ्या जनता दरबार दिनात एकूण ०२ तक्रार अर्जांवर सुनावणी घेण्यात येऊन सदर दोन्ही तक्रारींचे निवारण करण्यात आले.

वांद्रे (पूर्व) येथील म्हाडा मुख्यालयातील भारतरत्न गुलजारीलाल नंदा सभागृहात झालेल्या या लोकाभिमुख उपक्रमात, श्रीमती गायकर यांनी अर्जदारांच्या समस्यांचे त्वरित निवारण करत अर्जदारांच्या मागण्या व प्रलंबित कामे तत्परतेने सोडविण्याचे निर्देश संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनिक विभागांकरिता मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार व राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केलेल्या सूचनेनुसार १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. म्हाडाच्या सर्व विभागीय मंडळांनी १०० दिवसांच्या सात कलमी कृती आराखड्यातील "नागरिकांच्या तक्रारींचे निवारण" या महत्त्वपूर्ण घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जनता दिन आयोजित करावा, असे निर्देश 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी दिले आहेत. या निर्देशांची तात्काळ अंमलबजावणी करत कोकण मंडळाने आज दूसरा जनता जनता दरबार घेत शासनाच्या जनकल्याणकारी धोरणांची प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचा प्रत्यय दिला.

लोकशाही व्यवस्थेतील पारदर्शकता आणि जनतेशी थेट संवाद यांना अधोरेखित करणारी ही अभिनव संकल्पना पुढे नेण्याचा निर्धार कोकण मंडळाने केला आहे. 'म्हाडा' मुख्यालयात नियमितपणे राबविण्यात येणाऱ्या लोकशाही दिनाच्या धर्तीवर, प्रत्येक महिन्याच्या पहिल्या मंगळवारी 'जनता दरबार दिन'आयोजण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे.

आज झालेल्या जनता दरबार दिनात, अर्जदाराच्या नावे सदनिका असतांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत उपलब्ध सदनिकेसाठी सोडतीत चुकून अर्ज केलेल्या अर्जदाराने सदनिका म्हाडाकडे स्वाधीन करताना जमा केलेल्या अनामत रकमेचा पूर्ण परतावा करण्यासाठी अर्ज केला होता. सदर अर्जावर संबंधित अर्जदाराने https://bookmyhome.mhada.gov.in/ या संकेतस्थळावर जाऊन प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेअंतर्गत विक्री न झालेल्या योजनेतील सदनिका घेण्यास इच्छुक असल्याचे सांगितल्याने त्याबाबत खातरजमा करून सदर अनामत रकमेचा पूर्ण परतावा करण्याचे निर्देश श्रीमती गायकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

तसेच गोठेघर येथील गृहनिर्माण योजनेतील लाभार्थ्यांसाठी बससेवा सुरू करण्याबाबत अर्ज आला. सदर अर्जावर सुनावणी करताना श्रीमती गायकर यांनी नवी मुंबई महानगरपालिका व महाराष्ट्र राज्य

परिवहन महामंडळ यांना यापूर्वी दिलेल्या पत्राबाबत स्मरण पत्र देऊन त्यात मागणी निर्धारण करण्याबाबत नमूद करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

श्रीमती गायकर यांनी सर्व अर्जदारांचे म्हणणे सहानुभूतीपूर्वक ऐकून घेऊन, संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ व योग्य कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा






---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================

Outward No. : 773/67 Dt. May 16, 2025

**Press Release**

# Two Complaints Resolved During Second Janata Darbar Day by MHADA's Konkan Board

Mumbai, May 16, 2025: With an aim to address public grievances promptly and effectively, the Konkan Housing and Area Development Board of MHADA, under the chairpersonship of Chief Officer Revati Gaikar, conducted the second Janata Darbar Day today. A total of two complaints were heard and both were resolved during the session.

The citizen-centric initiative was held at the Bharat Ratna Gulzarilal Nanda Hall in MHADA Headquarters, Bandra (East). Mrs. Gaikar promptly addressed the grievances of the applicants and instructed concerned departmental officers to take swift action and resolve pending issues without delay.

Following the directives of Hon'ble Chief Minister Shri Devendra Fadnavis and as per the suggestions of the Hon'ble Deputy Chief Minister and Housing Minister Shri Eknath Shinde, a 100-day action plan has been initiated by various administrative departments of the Government of Maharashtra. In line with this, MHADA's Vice President and Chief Executive Officer Shri Sanjeev Jaiswal has directed all divisional boards to organize Janata Darbar Days as part of the seven-point action plan, especially focusing on grievance redressal.

By conducting its second Janata Darbar, the Konkan Board has affirmed its commitment to the effective implementation of the government's public welfare policies.

Emphasizing transparency in democratic governance and direct engagement with citizens, the Konkan Board has resolved to carry forward this innovative initiative. Like the regular Lokshahi Din conducted at MHADA headquarters, the Board has decided to organize Janata Darbar Day on the first Tuesday of every month.

During today's Janata Darbar Day, a complaint was received from an applicant who had mistakenly applied for a PMAY (Pradhan Mantri Awas Yojana) unit despite already owning a MHADA flat. The applicant had returned the allotted flat and requested a full refund of the earnest money deposited. After the applicant expressed willingness to purchase a flat from the unsold inventory under the "First Come, First Served" scheme via the website https://bookmyhome.mhada.gov.in, Mrs. Gaikar instructed the concerned officers to verify the matter and process a full refund accordingly.

Another complaint was related to initiating a bus service for beneficiaries of the housing scheme at Gotheghar. During the hearing, Mrs. Gaikar directed officials to send a reminder

letter to the Navi Mumbai Municipal Corporation and the Maharashtra State Road Transport Corporation referring to the earlier correspondence, and to include a request for demand assessment in the follow-up.

Mrs. Gaikar heard all the applicants and issued clear instructions to the officials for immediate and appropriate action.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA